महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक: एमआयएस-०१२०/सीआर १०/२०२३/मा.तं. दिनांक:-२४ एप्रिल, २०२३

# -: प्रेसनोट :-

**विषय:- महाराष्ट्र अराजपत्रित गट-ब व गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२३-प्रवेशप्रमाणपत्राबाबत**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक ३० एप्रिल, २०२३ रोजी नियोजित विषयांकित परीक्षेची प्रवेशप्रमाणपत्र एका टेलिग्राम चॅनेलवर प्रसिध्द झाल्याच्या अनुषंगाने खालील माहिती उपलब्ध करुन देण्यात येत आहे:-

(१) आयोगाच्या दोन संकेतस्थळांपैकी https://mpsc.gov.in या मुख्य संकेतस्थळावर जाहिराती, प्रसिध्दीपत्रके, निकाल, अभ्यासक्रम, इत्यादी PDF फाईलच्या स्वरुपातील माहिती प्रसिध्द केली जाते. उमेदवारांचा कोणताही वैयक्तिक विदा (डेटा) ठेवला जात नाही.

(२)ऑनलाईन अर्जप्रणाली करीता स्वतंत्र असलेल्या https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उमेदवारांचे प्रोफाईल, विविध जाहिरातींकरीता केलेले अर्ज, प्रवेशप्रमाणपत्रे, गुणपत्रक, इत्यादी वैयक्तिक तपशील उपलब्ध करुन दिले जातात.

(३) दिनांक ३० एप्रिल, २०२३ रोजीच्या परीक्षेला ४,६६,४५५ उमेदवार आहेत. एवढ्या मोठ्या संख्येने असलेल्या उमेदवारांची प्रवेशप्रमाणपत्रे केवळ आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीद्वारे उपलब्ध करुन दिल्यावर प्रवेशप्रमाणपत्रे डाऊनलोड करण्यासाठी उमेदवारांची झुंबड उडते आणि त्यामुळे आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळाचा सर्व्हर डाऊन होतो, हा आयोगाचा मागील काही परीक्षांचा अनुभव आहे. यास्तव, उमेदवारांना प्रवेशप्रमाणपत्र डाऊनलोड करताना सर्व्हर डाऊनचा अडथळा येऊ नये, याकरीता प्रवेशप्रमाणपत्रे डाऊनलोड करण्यासाठी आयोगाच्या मुख्य संकेतस्थळावर (https://mpsc.gov.in) एक वेगळी बाह्यलिंक मागील काही वर्षापासून उपलब्ध करुन देण्यात येते, ज्यातून केवळ PDF स्वरुपातील प्रवेशप्रमाणपत्रेच डाऊनलोड करता येतात.

(४) आयोगाच्या मुख्य संकेतस्थळावरील (https://mpsc.gov.in) बाह्यलिंकच्या वेबपेजच्या कोडमध्ये छेडछाड करुन काही उमेदवारांची प्रवेशप्रमाणपत्रे टेलिग्रामवरील एका चॅनेलने मिळविली. सदर बाब निदर्शनास आल्यानंतर आयोगाकडून प्रवेशप्रमाणपत्राची बाह्यलिंक तातडीने बंद करण्यात आली, त्यानंतर टेलिग्राम चॅनेलवर प्रवेशप्रमाणपत्रे अपलोड होणे बंद झाले. आयोगाने लिंक बंद केल्यानंतर संबंधित चॅनेलने उमेदवारांचा इतर विदा मिळविल्याचा दावा केला. त्यामध्ये एक दावा प्रश्नपत्रिका हॅक केल्याचा होता. वस्तुत: आयोगामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या या स्पर्धा परीक्षेच्या प्रश्नपत्रिका ऑनलाईन नाहीत, त्यामुळे कोणत्याही पध्दतीने संबंधित चॅनेलने त्या मिळविण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. यावरुन संबंधित चॅनेल अवास्तव व धादांत खोटे दावे करत असल्याचे प्रथमदर्शनीच जाणवते. दरम्यानच्या काळात आयोगाच्या माहिती तंत्रज्ञान विभागाने आयोगाच्या वेगवेगळ्या सर्व्हरवर होणाऱ्या हिट्सचा मागोवा घेऊन कोणीही अनधिकृत प्रवेश मिळविला नसल्याची खात्री केली. तसेच बाह्यलिंकवरुन अनधिकृतपणे प्रवेशप्रमाणपत्रे डाऊनलोड करणारा संशयित आयपी ॲड्रेस मिळविला, ज्यावरुन संबंधित चॅनेलकडे केवळ बाह्यलिंकवर उपलब्ध करुन देण्यात आलेल्या काही PDF स्वरुपातील प्रवेशप्रमाणपत्राव्यतिरिक्त अन्य कोणताही विदा नसल्याची खात्री झाली. तसेच, आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळावरील उमेदवारांच्या विदास कोणतीही छेडछाड झाल्याचे दिसून आले नाही.

(५)...

(५) आयोगाकडून दिनांक २३ एप्रिल, २०२३ रोजी दुपारी १.१० वाजता विषयांकित परीक्षेच्या प्रवेशप्रमाणपत्राबाबत प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रसिध्दीपत्रकानंतर संबंधित टेलिग्राम चॅनेलने उमेदवारांचा वैयक्तिक तसेच प्रश्नपत्रिकेचा विदा आपल्याकडे असल्याचा दावा करणारी पोस्ट चॅनेलवरुन हटविली असल्याचे दिसून येते.

(६) दिनांक २३ एप्रिल, २०२३ रोजी यासंदर्भात सीबीडी बेलापूर पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यात आलेला असून याप्रकरणी सखोल तपास सुरु आहे.

सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग